# भारतीय शेती क्षेत्राच्या विकासासाठी भविष्यकालीन धोरण

प्रा. श्वेता मयेकर
सहाय्यक प्राध्यापिका
विस्तार शिक्षण विभाग

प्रा. मनिषा अपराज
सहाय्यक प्राध्यापिका
मृदविज्ञान व कृषी रसायनशास्त्र विभाग
कृषि महाविद्यालय, फोंडाघाट

कु. विश्रांती गवळी
पदव्युत्तर पदवी विद्यार्थिनी
विस्तार शिक्षण विभाग
डॉ.बा.सा.कों.कृ.वि., दापोली

कृषी विकासाच्या प्रक्रियेत शासनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. कृषी विकास हि दीर्घकालीन प्रक्रिया आहे. १९९० नंतर सुरु झालेल्या जागतिकीकरणाच्या प्रक्रीयेमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावरील बरेच देश व त्या देशांचे कृषी उत्पादन भारतीय बाजारपेठेत दाखल होत आहेत. जागतिक व्यापार संघटनेच्या माध्यमातून कृषी विकासावर अनेक प्रकारची संकटे निर्माण होण्याची शक्यता तज्ञाकडून वर्तवली जाते. भारतीय शेती क्षेत्राच्या विकासासाठी पुढील धोरण राबवल्यास किंवा उपाययोजना केल्यास अपेक्षित यश मिळण्याची अधिक शक्यता राहील.

**१. कृषीला कर्ज पुरवठा:** सरकारने भू-तारण, अधिकोष, राज्य सहकारी अधिकोष, जिल्हा सहकारी मध्यवर्ती अधीकोश व खेड्यातील सहकारी संस्था यांच्या मार्फत कर्जपुरवठ्याचे काम मोठ्या प्रमाणावर सुरु केले आहे. सरकार शेतकऱ्यांना पंपिंग सेट, विद्युत मोटार, ऑईल इंजिन्स विकत घेण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडिया व सहकारी बँकेतर्फे कर्ज देते. प्रत्येक बँकेच्या शाखेत एक शेती विभाग उघडण्यात आला आहे व त्या विभागाद्वारे कर्जपुरवठा करण्यात आलेला असला तरी कर्ज पुरवठा करत असताना अनेक प्रकारच्या तांत्रिक बाबींची पूर्तता करावी लागते. त्यामुळे त्यांना कृषीचा अपेक्षित विकास करता येत नाही त्यामुळे भारत सरकार, रिझर्व बँक ऑफ इंडिया आणि देशातील विविध राज्ये यांनी एकत्रित येवून सूत्रबद्ध कार्यक्रम तयार करणे आवश्यक आहे.

**२. कृषी श्रम उत्पादकता:** भारतीय कृषी तंत्र पारंपारिक असल्याने शेती उत्पादन अल्प आहे. शेतीत काम करणाऱ्या मजुरांची ही उत्पादन क्षमता कमी आहे. त्यामुळे दरडोई उत्पादन फारच कमी आहे. जगात भारतीय शेत श्रमिकांची उत्पादकता सर्वात कमी आहे. जोपर्यंत कृषी श्रमिकांची उत्पादकता वाढणार नाही तोपर्यंत कृषीचा पूर्ण विकास होणार नाही.

**३. उत्पादित मालाच्या मूल्याबाबत स्थिरतेचा अभाव:** कृषीमालाच्या किमतीचा प्रभाव इतर मालाच्या किमतीवर पडतो. यासाठी सरकार मार्फत कृषी मालाच्या आधारभूत किमती जाहीर केल्या जातात. मात्र हे धोरण राबवताना कृषी मालाच्या किमती स्थिर ठेवल्यास आपोआप दुसऱ्या वस्तूंच्या किमती स्थिर राहतील व देशात आर्थिक स्थायित्व निर्माण होईल.

**४. पशुंसाठी चारा:** अन्नधान्य उत्पादनापासून मानवाच्या दृष्टीने जे टाकावू पदार्थ आहेत त्याचा उपयोग पशूंसाठी चारा म्हणून केला जातो. पीक कापणी मळणी करत असताना पशूंसाठी वर्षभर चारा कसा पुरेल या दृष्टीने शेतकरी विचार करतो. पशुंद्वारे अन्न, दुध, लोणी, तूप इ. मिळते. यापासून हि शेतकऱ्यांना उत्पन्न मिळते. त्यामुळे याकडे पूरक व्यवसायाच्या दृष्टीकोनातून पाहून याचा विचार करणे आवश्यक आहे.

**५. वाहतूक साधनांचा विकास:** ग्रामीण भागात आजही दलाल किंवा व्यापारी हे खेड्यात जावून कृषी माल कमी किमतीत खरेदी करतात. शेतकरी ही स्वत:ची आणि कुटुंबाची गरज भागवण्यासाठी कमी किमतीत माल विकतात. वाहतुकीच्या साधनांचा अभाव असल्याने शेतकरी गावातच माल विकतात. अपुरी वाहतूक व्यवस्था व रस्त्यांची गैरसोय यामुळे शेतमालास कमी किमत मिळते. यासाठी कार्यक्षम वाहतूक व्यवस्था व रस्त्यांच्या सोयी करणे आवश्यक आहे.

**६. आंतरिक व्यापाराकडे लक्ष देणे:** भारतातील आर्थिक निर्णय हे सर्वसामान्य शेतकऱ्यांपेक्षा उद्योगपतींच्या हिताला प्राधान्य देणारी ठरतात. उद्योगपती कारखान्यात उत्पादित होणाऱ्या वस्तूंची निर्यात होणाऱ्या अनुषंगाने शासनाकडून सवलती प्राप्त करून घेतात. त्यामुळे अंतर्गत व्यापार हा दुर्लक्षित राहू नये याकडे लक्ष दिले पाहिजे.

**७. मालाच्या श्रेणीकरण व प्रमाणीकरणा बाबत धोरण:** भारत सरकारने १९३७ मध्ये शेतमाल श्रेणीकरण व विक्री अधिनियम मंजूर केला. या अधिनियम अंतर्गत विपणन निरीक्षणात श्रेणीकरणानंतर त्यावर लेबल ऍगमार्क लावण्यात येते. मात्र प्रमाणीकरणात व श्रेणीकरणात प्रामुख्याने शिक्षित व अनुभवी कर्मचाऱ्यांचा अभाव, सभासदात अप्रामाणिकपणा, व्यापाऱ्यांचा विरोध, भांडवलाचा अभाव, भांडारगृहाचा अभाव, संघटनेचा अभाव, विपणनाच्या आधारभूत बाबींची मंद गतीने प्रगती इत्यादी समस्या महत्त्वाच्या आहेत.

अशाप्रकारे पावले उचलल्यास नक्कीच कृषि क्षेत्राचा विकास होईल. शेती अर्थशास्त्र हे सामाजिक शास्त्राचे उपयोजित क्षेत्र असून या शास्त्रात आपण शेतीचे अर्थशास्त्र, भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीची भूमिका, उत्पादन व उत्पादकता, जमीन सुधारणा, हरितक्रांती, शेतमाल विपणन व शेती व वन विकासाचे धोरण यशस्वी करण्यासाठीच्या उपाययोजना विचारात घेतल्या.

(संपर्क: +९१ ९४४६९७०७५०)

★ ★ ★